पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ३

**सभावृत्तांत**

दिनांक - **२६/०६/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **मंगळवार** दिनांक **२६/०६/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.चौगुले सीमा दत्तात्रय - सभापती**
२. मा.भोईर सुरेश शिवाजी
३. मा.घोलप कमल अनिल
४. मा.गायकवाड निर्मला मनोज
५. मा.उषा संजोग वाघेरे – पाटील
६. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.इंदलकर - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पुजारी – कार्यकारी अभियंता, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**खालीप्रमाणे सुचना मांडण्यात आली.**

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.निर्मला गायकवाड

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची दि.२६/०६/२०१८ ची पाक्षिक सभा (कार्यपत्रिका क्रमांक ०३) सोमवार दि.०२/०७/२०१८ रोजी दु. ३.०० वा.पर्यंत तहकुब करण्यात यावी.

सदरची सुचना सर्वानुमते मान्य झाली.

-----------

**सभापती -** सोमवार, दि.०२/०७/२०१८ रोजी दु. ३.०० वा.पर्यंत सभा तहकुब करणेत येत आहे.

(**सीमा दत्तात्रय चौगुले**)
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ३

**सभावृत्तांत**

( दिनांक २६/०६/२०१८ ची तहकुब सभा )

दिनांक - **०२/०७/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची दिनांक २६/०६/२०१८ ची तहकुब सभा **सोमवार** दिनांक **०२/०७/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.चौगुले सीमा दत्तात्रय - सभापती**
२. मा.भोईर सुरेश शिवाजी
३. मा.घोलप कमल अनिल
४. मा.गायकवाड निर्मला मनोज
५. मा.निलेश हिरामण बारणे

या शिवाय मा.इंदलकर - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पुजारी – कार्यकारी अभियंता, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

दिनांक २२/०५/२०१८ व १२/०६/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०२) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------------

ठराव क्रमांक - ०८ विषय क्रमांक - ०१
दिनांक - ०२/०७/२०१८ विभाग – नगररचना व विकास
सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक : मा.कमल घोलप
संदर्भ: मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१८/१७३/२०१७, दि.२५/०९/२०१७

विषय - मौजे किवळे येथील स.नं.३९ ते ७१ येथील मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रस्त्याखालील क्षेत्राचे भूसंपादन करणेबाबत.

विषय क्रमांक ०१ चा विचार दिनांक ११/०९/२०१८ चे सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ०९ विषय क्रमांक - ०२
दिनांक - ०२/०७/२०१८ विभाग – नगररचना व विकास
सुचक : मा.सुरेश भोईर अनुमोदक : मा.निर्मला गायकवाड
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१८/१७४/२०१७, दि.२५/०९/२०१७

विषय : मौजे किवळे येथील स.नं. ७३, ७४, ७५ व ७६ येथील मंजूर विकास योजनेतील १२.०० मी. रस्त्याखालील क्षेत्राचे भूसंपादन करणेबाबत.

विषय क्रमांक ०२ चा विचार दिनांक ११/०९/२०१८ चे सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १० विषय क्रमांक - ०३

दिनांक - ०२/०७/२०१८ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.सुरेश भोईर अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१३/५४/२०१५, दि.११/०५/२०१५

विषय : पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी. हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व १४ पै. मधील २४ व १२ मी. रुंद (पुर्व-पश्चिम) रस्त्याचे क्षेत्र भूसंपादनाबाबत.

विषय क्रमांक ०३ चा विचार दिनांक ११/०९/२०१८ चे सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ११ विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०२/०७/२०१८ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.सुरेश भोईर अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१५/१७५/२०१८, दि.१९/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ महाराष्ट्र शासनाचे आदेश क्र.पीसीसी/३०९६/१८०१/सीआर–२६१/नवि-२२, दिनांक–११/०९/१९९७ अन्वये करणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसुचना क्र.टीपीएस–१८०५/१०५०/सीआर–७९५/०७/नवि-१३, दि.३०/०५/२००८ अन्वये मंजूर आहे. तसेच दि.१८/०८/२००९ रोजीच्या निर्णयान्वये पुनःप्रसिध्द केलेला भाग वगळता उर्वरित विकास योजना मंजूर असून शासन निर्णय क्र.टीपीएस/१८१२/प्र.क्र.५८/१२/पुर्नबांधणी क्र.२७/१२/ईपी मंजूरी/नवि-१३, दिनांक ०२/०३/२०१५ अन्वये उर्वरित भागाच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे.

मौजे चिखली येथील पिपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील खालील तक्यात दर्शविलेल्या प्रस्तावित रस्ता / आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | आ. क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | गट नं. | बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १. | - | मंजूर विकास योजनेतील १८ मी. रुंद रस्ता | सि.स.नं. ६५, ६६, ६७, ८८ व ६८९, तसेच गट नं. १२३ व गट नं. १६४३ | ४२००.०० चौ.मी. |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सीमा दत्तात्रय चौगुले)**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४०२/२०१८
दिनांक : ०२/०७/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.